04-07-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/3/2025 10:40 PM Page 1



# गिलने तोडले अनेक रेकॉर्ड्स !

## भारत मजबूत स्थितीत दुसऱ्या दिवसअखेर ५५० चा टप्पा पार : इंग्लंड समोर तगडे आव्हान

**बर्मिंगहॅम, दि. ३ :**



एजबॅस्टन येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताचा युवा कर्णधार शुभमन गिलने ऐतिहासिक कामगिरी केली. गुरुवारी सकाळी ११४ धावांवरून पुढे फलंदाजीला आलेल्या गिलने संयमित आणि प्रभावी खेळी करत आपले द्विशतक पूर्ण केले आणि एक नवा इतिहास रचला.

गिल इंग्लंडमध्ये कसोटी द्विशतक झळकावणारा पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे. विशेष म्हणजे, त्याने इंग्लंडच्या भूमीवर कसोटीत सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजाचा विक्रमही आपल्या नावावर केला आहे. त्याने २२२ धावा पूर्ण करताच, १९७९ मध्ये ओव्हल येथे सुनील गावस्कर यांनी केलेल्या २२१ धावांचा विक्रम मागे टाकला.

शतक झळकावल्यानंतर गिलने आपला डाव सुरू ठेवत ३११ चेंडूत २१ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने द्विशतक पूर्ण केले. लीड्समध्ये कसोटी कर्णधार म्हणून शतक झळकावल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच गिलने दुसऱ्या कसोटीत हा पराक्रम करत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधले.

गिलने इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या कसोटीत भारतीय कर्णधाराकडून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने मोहम्मद अझरुद्दीनचा १९९० मधील १७९ धावांचा विक्रम मोडीत काढत इतिहास रचला. याचप्रमाणे, इंग्लंडमधील कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करणारा भारतीय म्हणून त्याने सुनील गावस्करच्या १९७९ मधील २२१ धावांचा विक्रमही मागे टाकला.

१२५ व्या षटकात गिलने चौकारांची हॅटट्रिक करत २२२ धावांवर मजल मारली आणि त्यानंतर त्याचे २३० पार झाले. गिल कसोटीत द्विशतक करणारा २६ वा भारतीय फलंदाज ठरला असून, फक्त १३ खेळाडूंनीच भारतासाठी हे कामगिरी केलेली आहे.

शुभमन गिलची ही मॅरेथॉन खेळी केवळ वैयक्तिक पातळीवरच नव्हे, तर भारतीय संघाच्या एकूण धावसंख्येला उंचीवर नेणारी ठरली आहे. त्याच्या या ऐतिहासिक कामगिरीने भारताला मजबूत स्थितीत नेले असून, इंग्लंडच्या गोलंदाजांसमोर आव्हान उभे केले आहे.

भारताने ५०० धावांचा टप्पा पार केल्याने आता सामना पूर्णपणे भारताच्या पकडीत गेला आहे, असे चित्र दिसत आहे. गिलच्या नेतृत्वाखालील ही फलंदाजी भारतासाठी निर्णायक ठरू शकते.

बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा संघ गिलला रोखण्यात अपयशी ठरला आहे. ब्रायडन कार्सच्या एका शॉर्ट बॉलला गिलने ऑफ-साईडवर सहजतेने चौकारासाठी फटकावले. त्यावेळी भारताने ५०० धावांचा टप्पा गाठला.गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांची ७व्या विकेटसाठी झालेली ९६ धावांची भागीदारी भारताच्या डावाला अधिक भक्कम बनवत आहे. रवींद्र जडेजाच्या बाद झाल्यानंतर वॉशिंग्टनने स्थिरतेने फलंदाजी करत गिलला सुरेख साथ दिली आहे.

शुभमन गिलची फलंदाजी ही संयम आणि आक्रमकतेचा समतोल साधणारी ठरत आहे. तो सैल चेंडूंना संधी देत नाही, पण कोणत्याही धोका न पत्करता गरजेनुसार मोठे फटके मारतो. शोएब बशीर, जोश टंग आणि हॅरी ब्रूकसारख्या गोलंदाजांना गिलने सहजतेने खेळले आणि त्यांच्या षटकांमध्ये महत्त्वपूर्ण धावा घेतल्या.विशेषतः ब्रूकच्या गोलंदाजीचा सामना करताना, गिलने एकाच षटकात तीन चौकार खेचले आणि सामना भारताच्या बाजूने वळवला. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघ सध्या सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवत आहे. जर गिलचे त्रिशतकही पूर्ण झाले, तर ही कामगिरी भारतीय कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल.

# पाकिस्तानचे हॉकी संघ भारतातील स्पर्धांमध्ये सहभागी होणार ?

**नवी दिल्ली, दि. ३ :**

ऑगस्टमध्ये होणाऱ्या पुरुषांच्या आशिया कप आणि नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या ज्युनियर हॉकी विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या हॉकी संघाला भारतात प्रवेशासाठी परवानगी दिली जाण्याची शक्यता क्रीडा मंत्रालयातील सूत्रांनी व्यक्त केली आहे . या निर्णयामुळे दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या सीमावादाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली अनिश्चितता दूर झाली आहे.

पुरुषांचा आशिया कप स्पर्धा बिहारमधील राजगीर येथे पुढील महिन्यात होणार असून, ज्युनियर हॉकी विश्वचषक तमिळनाडूमधील चेन्नई व मदुराई येथे नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान आयोजित केला जाणार आहे. यासह, पाकिस्तानच्या सहभागाला औपचारिक मंजुरी मिळालेली आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय स्पर्धा सध्या होणार नाहीत, परंतु भारतात आयोजित आंतरराष्ट्रीय बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पाकिस्तानच्या सहभागावर कोणतेही बंधन घालण्यात येणार नाही. कोणत्याही देशाच्या सहभागी होण्यावर बंदी घालणे हे ऑलिंपिक चार्टरच्या विरोधात आहे आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला ते साजेसे होणार नाही असे क्रीडामंत्रालयाचे म्हणणे असल्याचे समजते.

जसे रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू असतानाही दोन्ही देश आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होत आहेत, तसेच भारतही ऑलिंपिक मूल्यांना अधोरेखित करत आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करत राहण्याची शक्यता आहे.

भारताने २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धांचे यजमानी मिळवण्याचे ध्येय ठेवले आहे. अशा पार्श्वभूमीवर, कोणत्याही देशाला रोखणे ही बाब भारताच्या भविष्यातील स्पर्धा आयोजनाच्या संधींसाठी घातक ठरू शकते, असे मंत्रालयाने स्पष्ट केले.

हॉकी आणि इतर क्रीडा प्रकारांप्रमाणेच क्रिकेटमधील धोरण मात्र वेगळे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून द्विपक्षीय क्रिकेट मालिका खेळल्या जात नाहीत. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदअंतर्गत होणाऱ्या स्पर्धांमध्येही दोन्ही संघ केवळ तटस्थ स्थळांवरच आमने-सामने येतात.

ज्युनियर हॉकी विश्वचषकाच्या गट टप्प्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे, तर आशिया कप ही स्पर्धा २०२६ च्या हॉकी विश्वचषकासाठी पात्रता ठरेल.

या निर्णयामुळे पाकिस्तानच्या नेमबाजी आणि पॅरा ॲथलेटिक्स संघांच्या भारतात होणाऱ्या स्पर्धांमधील सहभागालाही मार्ग मोकळा झाला आहे. सप्टेंबरमध्ये दिल्लीत आयोजित होणाऱ्या ज्युनियर वर्ल्ड कप ऑफ नेमबाजी आणि सप्टेंबर-ऑक्टोबरमधील वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पाकिस्तान सहभागी होणार आहे.

दरम्यान, क्रीडा मंत्रालयाने खेलो इंडिया' उपक्रमांतर्गत नव्या पद्धतीने वॉटर स्पोर्ट्स फेस्टिव्हलचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. हा फेस्टिव्हल जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध दाल लेकमध्ये होणार असून, कॅनोइंग, कायाकिंग, रोइंग, वॉटर स्कीइंग, ड्रॅगन बोट रेस आणि पारंपरिक शिकारा रेस अशा पाच प्रमुख जलक्रीडा प्रकारांचा समावेश असेल.

या खुल्या वयोगटातील स्पर्धेत देशभरातील ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ४०० हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धकांची निवड संबंधित क्रीडा महासंघाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांतील कामगिरीच्या आधारे, तसेच स्पर्धा तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार केली जाणार आहे.

# कॅनडा ओपनमध्ये श्रीकांतचा विजय

**ओंटारियो (कॅनडा), दि. ३ :**



कॅनडा ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत अनुभवी भारतीय शटलर श्रीकांत किदाम्बी याने युवा खेळाडू प्रियांशु राजावतवर १८-२१, २१-१९, २१-१४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. हा सामना ५३ मिनिटांपर्यंत रंगला.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या (बीडब्ल्यूएफ ) आकडेवारीनुसार, आंतरराष्ट्रीय सर्किटवर ही श्रीकांत आणि प्रियांशु यांची तिसरी भिडंत होती. यापूर्वीच्या २०२३ ऑस्ट्रेलियन ओपन आणि यंदाच्या जर्मन ओपनमध्ये दोन्ही वेळा प्रियांशुने सरळ गेममध्ये विजय मिळवले होते. मात्र, या वेळेस श्रीकांतने आपल्या अनुभवी खेळाने बाजी मारली.

श्रीकांतने या सामन्यातील निर्णायक तिसऱ्या गेममध्ये १४-१४ अशी बरोबरी असताना सात सलग गुण मिळवून सामना आपल्या बाजूने वळवला. यात १६-१४ वर केलेला उत्कृष्ट बचावात्मक ब्लॉक निर्णायक ठरला. या विजयामुळे त्याने प्रियांशुविरुद्ध आपली पराभवाची मालिका खंडित केली.

हैदराबादमध्ये दोघेही एकत्र सराव करतात आणि त्यामुळे एकमेकांच्या खेळाची चांगली ओळख ठेवतात. प्रियांशुने अनेकदा श्रीकांतच्या खेळाची तुलना स्वतःशी केल्याची कबुली दिली आहे. विशेषतः कोर्टवरील हालचाल, नेटवरील स्ट्रोक्स आणि आक्रमक शैली. हे गुण दोघांमध्ये समान आहेत. मात्र, आक्रमकतेच्या जोरावर काहीशा चुकाही त्यांच्या खेळात दिसून आल्या.

पहिल्या गेममध्ये प्रियांशुने आघाडी घेतली होती. मात्र, दुसऱ्या गेमपासून श्रीकांतने शटलवर नियंत्रण ठेवत रॅलींवर वर्चस्व मिळवले. दुसऱ्या गेममध्ये काही चुकांमुळे सामना हातातून निसटण्याच्या स्थितीत असतानाही त्यांनी निर्णायक गेमपर्यंत पोहोचून सामन्यावर शिक्कामोर्तब केले.

दरम्यान, दुसऱ्या एका सामन्यात भारताच्या दोन युवा खेळाडूंमध्ये झालेल्या संघर्षात २०२२ च्या जागतिक ज्युनियर चॅम्पियनशिप रौप्यपदक विजेता शंकर सुब्रमण्यम याने २०२३ च्या कांस्यपदक विजेता आणि यूएस ओपन विजेता आयुष शेट्टीचा २३-२१, २१-१२ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

आयुषने पहिल्या गेममध्ये झुंज दिली, मात्र शंकरच्या सातत्यपूर्ण रॅली-आधारित खेळापुढे त्याची एकही चाल चालली नाही. आयुष नेटवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करत होता, पण शंकरने त्याला संधी न देता रॅली लांबवत दबाव वाढवला.

आयोवामधील विजयानंतर लगेचच आयुष शेट्टीने या स्पर्धेत अपयश अनुभवले. थकवा आणि शंकरच्या नियंत्रणाधारित खेळामुळे त्याला यश मिळवता आले नाही. दुसऱ्या गेममध्ये शंकरने आघाडी मिळवून ती शेवटपर्यंत टिकवली आणि ४४ मिनिटांत सामना आपल्या नावे केला.

कॅनडा ओपनमधील हे सामन्यांचे निकाल भारतीय बॅडमिंटनच्या पुढील पिढीसाठी आशादायक ठरत आहेत, ज्यात अनुभवी खेळाडूंचा पुनरागमन आणि युवा शटलर्समधील चुरस स्पष्टपणे दिसून येते.

# विम्बल्डनमध्ये ब्रिटिश चाहत्यांना दिलासा

**लंडन, दि. ३ :**



विम्बल्डनमध्ये 'नवीन अँडी मरे'च्या शोधात असलेल्या ब्रिटिश चाहत्यांसाठी यंदाची स्पर्धा आश्वासक ठरत आहे. घरच्या मैदानावर खेळणाऱ्या सात ब्रिटिश पुरुष खेळाडूंनी दुसऱ्या फेरीत प्रवेश करत १९९७ नंतरची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. अँडी मरेच्या निवृत्तीनंतर यजमान देशाला उदयोन्मुख स्टारची प्रतीक्षा असतानाच, २३ वर्षीय चौथ्या मानांकित जॅक ड्रॅपर ब्रिटिश टेनिसच्या पुढच्या पर्वाचा चेहरा ठरत आहे.

२०१३ मध्ये अँडी मरेने ७७ वर्षांची प्रतीक्षा संपवत विम्बल्डन जेतेपद मिळवले होते. त्याआधी शेवटचा विजेता फ्रेड पेरी १९३६ मध्ये ठरला होता. आता, मरेच्या निवृत्तीनंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याच्या दिशेने ब्रिटिश टेनिसपटूंची नवी पिढी पुढे येताना दिसते आहे. यामध्ये ड्रॅपरसह डॅन इव्हान्स, जॅक पिनिंग्टन जोन्स आणि हौशी खेळाडू ऑलिव्हर टार्वेट यांचाही समावेश आहे.

टार्वेटने सेंटर कोर्टवर प्रभावी खेळ करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला, जरी त्यानंतर त्याला गतविजेता कार्लोस अल्काराझकडून पराभव पत्करावा लागला. उपस्थित प्रेक्षकांनी टार्वेटसह इतर खेळाडूंना भरभरून पाठिंबा दिला.

दुसऱ्या फेरीत सात खेळाडू! हे अविश्वसनीय आहे, असं चार्टर्ड फिजिओथेरपिस्ट कॅरोल स्वीट यांनी सांगितलं.हे पाहताना खूप आनंद होतो, असं दीर्घकाळ टेनिसप्रेमी असलेल्या जॉन आणि सारा पिकथॉर्न दाम्पत्याने म्हटलं. आता आपण एकाच अँडी मरेवर नाही, तर अनेक घरगुती खेळाडूंवर गर्व करू शकतो असे ते म्हणाले .

ब्रिटिश टेनिसची प्रशासकीय संस्था लॉन टेनिस असोसिएशन' (एलटीए)ने गेल्या काही वर्षांत टेनिसमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. त्याचे फलित आता दिसू लागल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

एलटीएने खेळामध्ये गुंतवलेला पैसा आता निकाल देताना दिसतो आहे, असं निवृत्त बँकर जॉन म्हणाले. त्यावर त्यांची पत्नी सारा म्हणाल्या, आपल्या खेळाडूंना अशा टप्प्यावर खेळताना पाहणं, हे फार उत्साही अनुभव असतो.

ड्रॅपरला सध्या ब्रिटनच्या पुढील टेनिस सुपरस्टारच्या भूमिकेत पाहिलं जात आहे. माजी टेनिसपटू जॉन मॅकएनरो यांनी देखील त्याचे कौतुक करत म्हटलं, जर तो मोठ्या स्पर्धा जिंकला नाही, तर मला आश्चर्य वाटेल. मरेचा भाऊ व माजी मिश्र दुहेरी विजेता जेमी मरे यांनी तर ठामपणे म्हटलं, तो ब्रिटनचा पुढचा सुपरस्टार आहे यात शंका नाही.

तरीही ड्रॅपर स्वतःवर उगाच दबाव न आणता आपली वाटचाल संयमाने करत आहे. मी पुढचा अँडी मरे बनण्याचा प्रयत्न करत नाही. मी स्वतःच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करतो, असं त्याने द टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केलं.

१९९० च्या दशकात टिम हेनमनने हेनमॅनिया' निर्माण केली होती, पण अंतिम विजय त्याला मिळवता आला नाही. त्यानंतर मरेने दोन वेळा विम्बल्डन जिंकून इतिहास रचला. आता ड्रॅपरसह नव्या खेळाडूंची भरती होत असून, ब्रिटिश टेनिसच्या भविष्याविषयी आशा निर्माण झाली आहे.

अँडी मरेच्या प्रभावामुळे तयार झालेली प्रेरणा हीच आता नव्या खेळाडूंना पुढे घेऊन जात आहे. येत्या काही वर्षांत ही पिढी जागतिक स्तरावर नक्कीच ठसा उमटवेल, अशीच चाहत्यांची अपेक्षा आहे.

# रिअल माद्रिदची क्लब वर्ल्ड कप उपांत्यपूर्व फेरीत धडक

**मायामी, दि. ३ :**



गोंझालो गार्सियाच्या दुसऱ्या सत्रात झालेल्या निर्णायक हेडर गोलमुळे रिअल माद्रिदने मंगळवारी युव्हेंटसचा १-० असा पराभव करत क्लब वर्ल्ड कपच्या उपांत्यपूर्व फेरीत आपली जागा पक्की केली.

५४ व्या मिनिटाला ट्रेंट अलेक्झांडर-अर्नोल्डने मारलेल्या अचूक क्रॉसवर गार्सियाने जबरदस्त हेडर करत सामना निर्णायक वळणावर आणला. हा गार्सियाचा स्पर्धेतील चौथा गोल ठरला. यामुळे आता रिअलचा पुढील सामना बोरुसिया डॉर्टमुंड आणि मोंटेरे (मेक्सिको) यांच्यातील विजेत्याशी होणार आहे.

सामन्याची सुरुवात दोन्ही संघांच्या संतुलित खेळाने झाली. युव्हेंटसने आक्रमकतेने सुरुवात केली. इगोर ट्यूडरच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या युव्हेंटसकडून केनन यिल्डीझने प्रभावी खेळ करत रँडल कोलो मुआनीला गोलसंधी उपलब्ध करून दिली होती. मात्र, त्याचा प्रयत्न थिबॉट कोर्टोइसने थोपवला.

यिल्डीझने नंतर आणखी एक जोरदार प्रहार करत माद्रिदच्या संरक्षणाला अडचणीत टाकले, पण गोल होऊ शकला नाही. पहिल्या सत्राच्या उत्तरार्धात रिअलने खेळावर पकड मिळवत ज्यूड बेलिंगहॅम आणि फेडेरिको व्हॅल्व्हर्डेच्या प्रयत्नांनी युव्हेंटसच्या गोलकिपर मिशेल डी ग्रेगोरियोची कसोटी घेतली.

दुसऱ्या सत्रात रिअलने अधिक आक्रमक खेळ करत सतत दबाव वाढवला. बेलिंगहॅमने व्हॅल्व्हर्डेला सुंदर पास देत गोलसंधी दिली, मात्र शॉट थोडक्यात हुकला. बेलिंगहॅमचा स्वतःचा एक प्रहारही डी ग्रेगोरियोने उत्तम बचाव करत थोपवला.

शेवटी ५४ व्या मिनिटाला आलेल्या अलेक्झांडर-अर्नोल्डच्या क्रॉसवर गार्सियाने केलेल्या हेडरने रिअलला आघाडी मिळवून दिली.

युव्हेंटसने लगेच प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सिस्को कॉन्सेकाओच्या प्रयत्नावर कोर्टोइसने चपळतेने बचाव केला. त्यानंतर व्हॅल्व्हर्डेने ओव्हरहेड किकने पुन्हा एकदा गोलकिपरची परीक्षा घेतली.

स्पर्धेत पहिल्यांदाच कायलियन एमबाप्पेचा पुनरागमन झाला. ६८ व्या मिनिटाला तो मैदानात उतरला आणि ६२,१४९ प्रेक्षकांनी जोरदार उत्साह व्यक्त केला.

निकोलस गोन्झालेझने २५ यार्डवरून जोरदार फटका मारत गोलचा प्रयत्न केला, पण तोही निष्फळ ठरला. दुसऱ्या टोकाला रिअलच्या अर्दा गुलरचा प्रहार डी ग्रेगोरियोने पायाने वाचवला.

संपूर्ण सामन्यादरम्यान रिअलचा आक्रमणपट वाढत गेला आणि अखेर गोंझालोचा एकमेव गोलच निर्णायक ठरला.

रिअल माद्रिदचे प्रशिक्षक झाबी अलोन्सो यांनी गोंझालोच्या कामगिरीचे कौतुक करत त्याची तुलना क्लबच्या दिग्गज खेळाडू राऊलशी केली. तो दिवसेंदिवस चांगला होत आहे. उपांत्यपूर्व फेरीसाठी एमबाप्पे पूर्णपणे तयार असेल अशी मला खात्री आहे, असेही त्यांनी सांगितले.

दुसऱ्या सत्रात संघाने संयम आणि परिपक्वता दाखवली. आम्ही दुसरा गोल करू शकलो नाही, पण हे बाद फेरीचे सामने असतात. येथे खेळाडूंना थोडीशी धैर्याची कसोटी द्यावी लागते, असेही अलोन्सो म्हणाले.

युव्हेंटसचे प्रशिक्षक इगोर ट्यूडर यांनी त्यांच्या खेळाडूंनी शेवटपर्यंत झुंज दिल्याचे सांगितले. अंतिम क्षणी आमच्यातील १० खेळाडूंनी थकव्यामुळे बदल मागितले. उष्णता, आर्द्रता आणि एका मोठ्या हंगामाचा शेवट ही तिन्ही कारणे आमच्या कामगिरीवर परिणाम करणारी ठरली, असे ट्यूडर म्हणाले.

# भारताचे फूटबॉल कोच मनोलो मार्केझ यांचा राजीनामा

**नवी दिल्ली, दि. ३ :**



भारतीय फुटबॉल संघाच्या अलीकडील निराशाजनक कामगिरीची जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ ) ) आणि मुख्य प्रशिक्षक मनोलो मार्केझ यांच्यात परस्पर सहमतीने करार संपुष्टात आला आहे. यानुसार, मार्केझ यांनी बुधवारी भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला.

एआयएफएफ कार्यकारी समितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत, ५६ वर्षीय स्पॅनिश प्रशिक्षकाला त्यांच्या उर्वरित एक वर्षाच्या कराराआधीच पदावरून हटवण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यानंतर दोन्ही पक्षांनी कोणताही आर्थिक दंड किंवा नुकसानीशिवाय करार समाप्त करण्याचा निर्णय घेतला.

एआयएफएफ चे उपमहासचिव के. सत्यनारायण यांनी माहिती देताना सांगितले, एआयएफएफ आणि मनोलो यांनी परस्पर सहमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ते आता भारताचे प्रशिक्षक राहिले नाहीत. एआयएफएफ लवकरच नव्या प्रशिक्षकासाठी जाहिरात प्रसिद्ध करेल.

मार्केझ यांची भारतीय राष्ट्रीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती जून २०२४ मध्ये दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी करण्यात आली होती. त्याच काळात त्यांनी इंडियन सुपर लीगमधील एफसी गोवा संघाचेही मुख्य प्रशिक्षकपद सांभाळले होते.

मात्र, राष्ट्रीय संघाच्या निकालांनी त्यांची कामगिरी निराशाजनक ठरली. १० जून रोजी एएफसी आशियाई कप २०२७च्या पात्रता फेरीतील महत्त्वाच्या सामन्यात भारताला अव्वल मानांकन नसलेल्या हाँगकाँगकडून ०-१ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे भारताच्या पात्रतेच्या आशा संपुष्टात आल्या.

मार्केझ यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने अलीकडील आठ सामन्यांत केवळ एकच विजय नोंदवला तो म्हणजे मार्च महिन्यात मालदीवविरुद्धचा सामना. २०२५ सालाच्या सुरुवातीपासून भारताने चार आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून त्यात एक विजय, एक बरोबरी, तर दोन पराभव सहन करावे लागले आहेत.

या निराशाजनक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर, माजी कर्णधार आणि देशातील सर्वात प्रतिष्ठित स्ट्रायकर सुनील छेत्री यांची पुन्हा संघात निवड करण्यात आली होती. मात्र त्याचाही संघाच्या निकालांवर फारसा सकारात्मक परिणाम झाला नाही.

एआयएफएफ आता नव्या मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात असून, येणाऱ्या काही दिवसांत पदभरतीसाठी औपचारिक प्रक्रिया सुरू होणार आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक ३०२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 302 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .